**दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि.**
(मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)

**रजिस्टर्ड ऑफिस :** 'कॉसमॉस टॉवर', प्लॉट नं. ६, स.नं. १३२/बी,
आयसीएस कॉलनी, युनिव्हर्सिटी रोड, गणेशखिंड, पुणे-४११००७.
फोन : ०२०-६७०८६७०८

# विशेष सर्वसाधारण सभेची नोटीस (फक्त सभासदांकरिता)

**दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि.** च्या सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा **शनिवार, दि. ३० डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता ४ था मजला, कॉसमॉस टॉवर, प्लॉट नं. ६, आय.सी.एस. कॉलनी, युनिव्हर्सिटी रोड, गणेशखिंड, पुणे-४११००७** येथे होणार आहे. त्यावेळी पुढील कामकाज होईल. तरी सदर सभेस आपण अवश्य उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

## सभेपुढील विषय

१. बेंगलुरु येथील 'दि नॅशनल को-ऑप. बँक लि.' या बँकेच्या **दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि.** मधील विलीनीकरण योजनेस (Scheme of Amalgamation) मान्यता देणे व रिझर्व्ह बँकेकडे त्यास मान्यता देणेबाबत शिफारस करणे.

२. बँकेच्या सध्याच्या पोटनियमांमधील दुरुस्त्यांबाबत संचालक मंडळाने केलेल्या शिफारशींचा विचार करणे व मान्यता देणे.

**मा. संचालक मंडळाच्या आज्ञेवरुन**
**सौ. अपेक्षिता ठिपसे**
**व्यवस्थापकीय संचालिका**

**दिनांक :** ०६ डिसेंबर २०२३
**ठिकाण :** पुणे

## सूचना

१. वरील सभेस सकाळी ठीक ११.०० वाजता प्रारंभ होईल. त्यासाठी आवश्यक ती गणसंख्या पूर्ण झाली नसेल तर ही सभा स्थगित केली जाईल. अशा स्थगित सभेचे कामकाज त्याच दिवशी, त्याच ठिकाणी सकाळी ११.३० वाजता सुरु होईल व या स्थगित सभेस गणसंख्या पूर्तीची आवश्यकता राहणार नाही. या सभेत वरील नोटीशीमध्ये नमूद केलेल्या विषयांचा विचार करण्यात येईल.

२. दि. ३० डिसेंबर २०२३ रोजी होणाऱ्या विशेष सर्वसाधारण सभेपुढील विषयासंबंधीची कागदपत्रे बँकेच्या कॉसमॉस टॉवर या मुख्य कार्यालयात शुक्रवार, दि. २२ डिसेंबर २०२३ पर्यंत कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० या वेळेत पाहावयास मिळतील.

३. विशेष सर्वसाधारण सभेपुढील विषयांबाबत सभासदांना काही प्रश्न विचारावयाचे असल्यास ते लेखी स्वरुपात बँकेच्या मुख्य कार्यालयात शुक्रवार, दि. २२ डिसेंबर २०२३ पर्यंत कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० या वेळेत आणून द्यावेत, ही विनंती.

४. नोटीशीमधील विषयांच्या अनुषंगाने उपस्थित सभासदांमध्ये मतदान आयोजित करण्यात येणार असल्यामुळे बँकेच्या पोटनियमाप्रमाणे मतदान करण्यास पात्र असलेल्या सभासदांनाच सभास्थानी प्रवेश देण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

५. कृपया सभेस येताना सभासद ओळखपत्र जरुर सोबत आणावे.